# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली ४१५ ७१२, जि.रत्नागिरी

## निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

**डॉ.जीवनकुमार तलाठी**
सहयोगी अधिष्ठाता


जा.क्र. डॉ.बासाकोकृवि/निकृशि/ २५८ /२०१९ दिनांक : 7 JUN 2019

प्रति,

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतने,
...................................................

**विषय : कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश सुचनेबाबत..**

उपरोक्त विषयान्वये विद्यापीठांतर्गत शैक्षणिक सत्र २०१९—२० करिता कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश सुचनांची एक प्रत आपणांकडे पाठविण्यात येत आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, प्रवेश सुचना आपल्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी व विना अनुदानित कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनांनी दिनांक ११/०६/२०१९ किंवा १२/०६/२०१९ रोजी कृषि तंत्र पदविका/ कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश सुचनेस जिल्हास्तरावर प्रसिध्द होणाऱ्या वर्तमान पत्रातून स्वखर्चाने प्रसिध्दी देण्यात यावी व प्रसिध्द केलेल्या प्रवेश सुचनांची कात्रणे या कार्यालयास दिनांक. ०१/०७/२०१९ पुर्वी सादर करावी.

सोबत : प्रवेश सुचनेची प्रत

सहयोगी अधिष्ठाता
निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

प्रत माहीतीसाठी सविनय सादर....

१. मा. महासंचालक महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
२. मा. शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
४. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
५. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
   २/— आपणांस विनंती करण्यात येते की सदरची कृषि पदविका अभ्यासक्रम प्रवेश सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.


दूरध्वनी क्र. ०२३५८-२८२४११, २८२४१२ विस्तार १२२ E-mail : adlaedbskkv@rediffmail.com

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जिल्हा – रत्नागिरी (महाराष्ट्र)

निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

---

**कृषि तंत्र पदविका (२ वर्षे कालावधी)/ कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) थेट व्दितीय वर्ष व थेट तृतीय वर्ष (२ व १ वर्षे कालावधी)/मत्स्य अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षे कालावधी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया २०१९–२०**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर 'ऑफलाईन पध्दतीने' राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता :**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| २ | कृषि तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) (अर्ध इंग्रजी माध्यम) **थेट व्दितीय वर्ष व थेट तृतीय वर्ष** | --- | **थेट दुसऱ्या वर्षात प्रवेशासाठी** उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १२ वी) (विज्ञान) (भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र) या विषयांसह उत्तीर्ण |
| | | | **थेट तिसऱ्या वर्षात प्रवेशासाठी** महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठातून २ वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ३ | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (Fishery Engineering Polytechnic) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण |

सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठामार्फत 'ऑफलाईन पध्दतीने' पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर दि. १२ जून, २०१९ पासून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवायची कार्यपध्दती.**

- उमेदवाराने www.dbskkv.org या संकेतस्थळावर दि. १२ जून, २०१९ ते १ जुलै, २०१९ दरम्यान प्रवेश अर्ज डाउनलोड करुन, A4 पेपरवर प्रिंट काढून माहिती पुस्तिकेतील सूचनांचे पालन करुन स्वहस्ताक्षराने पूर्ण भरुन संबंधित विद्यालयात मुदतीत सादर करावा. यानंतर प्रवेश अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, व आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे साक्षांकीत/स्वसाक्षांकीत करुन, प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या कृषि तंत्र विद्यालय/निकेतन व मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालयात प्रवेश अर्जासह विहित शुल्क भरुन सादर करावे.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे टपालाने/कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क रोखीने संबंधित विद्यालयात भरावे व पावती घ्यावी.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क –**

खुल्या प्रवर्गासाठी रु.४००/–

आरक्षित प्रवर्गासाठी रु. २००/–(अ.जा.,अ.ज., वि.जा.*, भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.प्र.*)

[ * उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य ]

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळावर दि. १२/०६/२०१९ पासून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

क्र. डॉबासाकोकृवि/निकृशि/२५४/४५६४/२०१९
दिनांक : ०७ जून, २०१९

**सही/–**
**कुलसचिव,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जिल्हा – रत्नागिरी.